



साप्ताहिक

# खबर

से हकिकत तक

KHABAR SE HAKIKAT TAK

मुख्य संपादक
शिरीषकुमार तुकाराम शेरखाने
मो.९०४९८४४४१२




website : https://khabarsehakikattak.in
Email : shirishkumarsherkhane@gmail.com
RNI No. : MAHMAR/2023/86200

लातूर | मराठी | साप्ताहिक | वर्ष : २ रे. | अंक : १९ वा. | सोमवार दि. १४ ते २० ऑक्टोबर २०२४ | पाने : ४ | किंमत : २ रू.

# रक्तदान हेच जीवनदान संदेश देत डॉ.सचिन चव्हाण यांचा वाढदिवस साजरा





### या रक्तदात्यांचा आम्हा सर्वांना सार्थ अभिमान वाटतो

शेख सलीम, ताशेवाले सत्तार अ. गणी,महाके मनोज, राजमाने सुधीर,डॉ. मानसी सूर्यवंशी,सावळकर जगदीश, काळे शंकर,शेख एजाज,कसबे उमेश,हेंबाडे बजरंग, कोडबोले दयानंद,राऊत अमोल,सावंत सौरभ, वाघडोळे ऋषिकेश,पाटील निलेश,डोनगावे केदार, भोजने सिद्धेश्वर, ढमढेरे संतोष, शेख सलाउद्दीन, कांबळे मोनिका, आपण सर्वांनी रक्तदान करून जीवदान देण्याचे महान कार्य केले. आपल्या सर्वांचे हार्दिक अभिनंदन.

लातूर (प्रतिनिधी): रविवार दिनांक १३ ऑक्टोबर रोजी औसा रोड राजीव गांधी चौक लातूर येथील नामांकित असलेले चव्हाण हॉस्पिटल येथे डॉ. सचिन चव्हाण यांचा वाढदिवस साजरा केला. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा समजून अविरत अखंड रुग्णांची सेवा करणारे, जनमानसातले प्रेरणास्थान असलेले, डॉ. सचिन चव्हाण यांचा विविध पॅथॉलॉजी चे कर्मचारी, सहकारी, मित्रपरिवार, हॉस्पिटल मधील सर्व स्टाफ, आर एम ओ, एडमिस्ट्रेटिव अधिकारी, एन सी आय बी नवी दिल्ली शाखा लातूरचे अधिकारी, पत्रकार, या सर्वांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजातील विविध घटकातील तरुण-तरुणींना रक्तदान करण्याचे आवाहन केले. त्याप्रमाणेच सर्वांनी पुढाकार घेऊन रक्तदान केले.



समाजामध्ये प्रत्येक जण विविध प्रकारे आपले वाढदिवस साजरे करत असतात, पण हा वाढदिवस आगळावेगळा असून राष्ट्रीय संदेश जनमाणसात पोहोचण्याचे काम सर्व चाहत्यांनी केले. या सर्वांचे प्रेरणास्थान असलेले डॉ. सचिन चव्हाण यांनी आदर्श घालून दिला. आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण जन माणसाच्या उपयोगी आणि रुग्णांच्या कल्याणासाठी आणि जीवनासाठी सार्थक व्हावा, हा विचार पुढे घेऊन जाण्यासाठी आपला वाढदिवस इतरांच्या उपयोगाचा ठरावा. असे मत व्यक्त केले. रक्तदान करण्यासाठी विविध स्थरातले तरुण-तरुणी यांनी पुढे येऊन उत्साहपूर्वक रक्तदान केले. याप्रसंगी लातूर शहरातील सर्व पॅथॉलॉजी लॅब मधील टेक्निशियन मधील सर्व स्टाफ, नर्स, वार्ड बाय, आर एम ओ डॉक्टर, सेविका, इतर कर्मचारी वर्ग, मेडिकलचे कर्मचारी, सहकारी मित्रपरिवार तसेच राष्ट्रीय अपराध ज्यांच ब्युरो नवी दिल्ली, शाखा लातूरचे अधिकारी, पत्रकार, आदींनी रक्तदान शिबिर यशस्वीतेसाठी योगदान दिले.

या रक्तदान शिबिराच्या प्रसंगी रुग्णालयाच्या परिसरातील सर्व सामाजिक कार्यकर्ते, रुग्णांचे नातेवाईक, प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. सचिन चव्हाण यांना शुभेच्छा देऊन अभिष्टचिंतन केले. याच प्रसंगी रक्तदात्यांचा सन्मानपूर्वक गौरव करण्यात आला.

### रक्तदान शिबिर यशस्वीतेसाठी डॉ.भालचंद्र रक्तपेढी लातूर यांचेही मोठे योगदान

डॉ. भालचंद्र रक्तपेढी गांधी मार्केट, लातूर येथील सर्व टेक्निशियन स्टाफ प्रमुख कांबळे किशोर टेक्निकल सुपरवायझर, पाटील संतोष, कासले अरुण, सौ. सुरेखा हजारे, ठाकूर संजय, बुरबुरे अमर, मुख्यमंत्री सहायता निधी मार्गदर्शक अमर माळी, आदींनी आपली कुशलता वापरून रक्तदान शिबिर करण्याच्या कामी मोलाची कामगिरी केली .

# श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान लातूरने अन्नपूर्णा छत्राचा भक्तांसाठी राबविला स्तुत्य कार्यक्रम







**श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान लातूरने केलेले विशेष नियोजन**

**● ग्राउंड रिपोर्ट ●**
**शिरीषकुमार शेरखाने**
**लातूर -9049844412**

लातूर(प्रतिनिधी): महाराष्ट्राचे कुलदैवत तुळजापूरची श्री तुळजाभवानी माता शारदीय नवरात्र महोत्सव निमित्त देवीचे दर्शन घेण्यासाठी कर्नाटक तेलंगणा आंध्र प्रदेश महाराष्ट्र अशा विविध राज्यातून भाविक लाखोंच्या संख्येने पायी चालत दर्शनासाठी येतात. विशेषतः कर्नाटक राज्यातील भाविक जास्त असतात.

दररोज हजारोंच्या संख्येने अनेकजण पायी चालत तसेच विविध वाहनातून दर्शन घेण्यासाठी येत असलेल्या मुलाबाळासह नागरिकांची संख्या जास्त असते. हे भाविक दिवस-रात्र प्रवास करतात अशा भाविकांसाठी तुळजापूर मार्गावर विविध अन्नछत्र उभारलेले असतात. त्याचाच एक भाग म्हणून खऱ्या अर्थाने जनसेवा हीच ईश्वर सेवा असे मानणारे लातूर जिल्ह्यातील विशेषतः लातूरचे व्यापारी मित्र मंडळ यांनी स्वतःच्या नावाची प्रसिद्धी न करता *एका हाताने केलेले दान, पुण्य, दुसऱ्या हाताला समजू नये अशी भावना ठेवून, २४ तास भाविकांच्या अविरत सेवेकरिता तत्परता दाखवून लाखो भाविकांना चहा, उपवासासाठी फराळ, फळ-फळावळ व भोजनाची सुविधा पुरविणारे श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान लातूर. व्यापारी मित्र मंडळाने अन्नपूर्णा छत्र उभारून सेवा पुरविण्याचे कार्य केले. यातूनच या भक्तजनांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान पहावयास मिळाले. या सेवेबद्दल आणि उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र कर्नाटक तेलंगणा आंध्र प्रदेश राज्यांमधील भाविकांमध्ये स्तुत्य कार्याचा विषय ठरला गेला. आणि श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान लातूरचे आभार मानण्यात आले.

❖ २४ तास अन्नदान ❖ भक्तांच्या सेवेसाठी आळीपाळीने सत्तर(७०) कामगार ❖ शारदीय नवरात्र महोत्सव यासाठी सलग नऊ दिवस अहोरात्र अविरत सेवा ❖ स्वयंपाकासाठी शेगावच्या महिला भगिनींचे योगदान ❖ पौर्णिमेसाठी एक दिवस विशेष अन्नदान ❖ अन्नदानाचा मेनू: राईस (भात), शिरा, पुरी भाजी, उसळ, साबुदाणा खिचडी, विविध फळ फळावळ, ❖ प्रत्येक कामगार सेवकांना प्रति पाचशे रुपये मानधन.

**अन्नपूर्णा छत्राची उल्लेखनीय कार्याची विविध सेवाभावी संस्था सोयसेवी संघटना तसेच राष्ट्रीय अपराध जांच ब्युरो, नवी दिल्ली. शाखा लातूर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन या कार्याची प्रशंसा केली. यावेळी श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान लातूर अन्नपूर्णा यांचा स्तुत्य कार्यक्रम समाजासाठी एक आदर्श ठरला. असे मत एन.सी.आय.बी. लातूर शाखेने व्यक्त केले. आणि श्री तुळजाभवानी प्रतिष्ठान लातूर यांचे अभिनंदन केले.**





# शारदीय नवरात्र तुळजाभवानी महोत्सवात बिरादार (पाटील) दांपत्याचा स्तुत्य उपक्रम



लातूर(प्रतिनिधी): महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवानिमित्त भक्तजन देवीच्या दर्शनासाठी जात असतात. त्या भक्तजनांची विविध प्रकारे सेवा केली जाते. विविध राज्यातून भक्त येत असतात. त्यात सर्वधर्मसमभाव संकल्पना जोपासत महादेव विश्वनाथ बिरादार (पाटील) सौ. दीक्षा महादेव बिरादार (पाटील) या दापंत्यांनी जनसेवा हीच ईश्वर सेवा असे समजून अन्नदानाच्या रूपाने गेली सहा वर्ष अविरत अखंड सेवा केली आहे. याही वर्षी देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना पाणी, फळ फळावळ केळी, आधीचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या वेळी राष्ट्रीय अपराध ज्यांच ब्युरो, नवी दिल्ली. शाखा लातूर यांनी भेट देऊन प्रशंसा केली. आणि धन्यवाद दिले. या स्तुत्य कार्यक्रमात अभिषेक बोरुले, राम शेळके, ऋतुराज पाटील, इंद्रजीत शिंदे सहकारी मित्रांनी योगदान दिले. बिरादार (पाटील) हे अवधूत फार्मचे व्यापारी असून यांचे नेहमीच समाजामध्ये मोठे योगदान असते. बिरादार पाटील यांनी स्तुत्य उपक्रम राबवून समाजामध्ये आदर्श निर्माण केला आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.



## संपादकीय....

# सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह!

सध्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी वाढत असुन बलात्कार, लुटमारी, खुनी दरोड्याचे प्रमाण वाढत चालल्याने सर्वसामान्य नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला असुन महाराष्ट्र शासन भरपूर प्रमाणात प्रयत्न करत आहे परंतू वाढती लोकसंख्या, अपुरा पोलीस पुरवठा असल्यामुळे वाढत्या गुन्हेगारीवर अंकुश ठेवण्यास पोलीस यंत्रणा हतबल होत असल्याचेच चित्र दिसून येत आहे. याचमुळे मोठ्या प्रमाणात गुन्हे घडत असल्याचे अधिकारी वर्गातून सांगितले जाते.

ऐन निवडणुकीच्या धामधुमीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या निर्घृण हत्येने राज्यातील कायदा व सुव्यवस्थेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. ही हत्या करणाऱ्या कंत्राटी मारेकऱ्यांना पकडल्यानंतर करण्यात आलेल्या त्यांच्या चौकशीतून पोलिसांचा लॉरेन्स बिश्नोई टोळीवर संशय बळावला आहे. हा बिश्नोई गेली दहा वर्षे साबरमती तुरुंगात शिक्षा भोगतो आहे. मात्र सध्या त्याचा बोलबाला इतका, की तो केवळ भारतापुरता मर्यादित राहिलेला नसून साता समुद्रापारही त्याचे अनेक कारनामे सुरू असल्याचे तपास यंत्रणा सांगतात. प्रकाश झा यांच्या 'अपहरण' सिनेमात तुरुंगातूनही अपहरणासारख्या गुन्ह्यांचे व्यावसायिकरण कसे होते, हे दाखविले होते. मात्र बिश्नोईसारख्या अपराध्यांची तुरुंगात राहून दहशत माजविण्याच्या व्यवसायावरील पकड पाहून 'अपहरण' सिनेमाचे कथानकही फिके पडेल की काय, असेच वाटावे. एकीकडे प्रा. साईबाबा यांच्यासारख्या नव्वद टक्के विकलांग व्यक्तीला काँग्रेसच्या काळात नक्षलवाद्यांस मदत केल्याच्या संशयावरून पकडले जाते व दहा वर्षांनी त्यांची निर्दोष सुटका होते. भाजपच्या काळात विकलांगतेमुळे त्यांना द्रव पदार्थ पिण्यासाठी गरजेची नळीही तुरुंग प्रशासन देत नाही व दुसरीकडे बिश्नोईसारखा गुंड तुरुंगात राहून कंत्राटी पद्धतीने विशीतील तरुणांना आपल्या टोळीत सामील करतो, तसेच त्यांच्याकडून लोकप्रतिनिधीची हत्याही करवतो यातच ढासळलेली व्यवस्था लक्षात येते. बाबा सिद्दिकी यांनी युवक काँग्रेसपासून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली.

पुढे मुंबई महानगरपालिकेत दोन वेळा नगरसेवक, वांद्रे पश्चिम मतदारसंघातून तीन वेळा आमदार, एकदा राज्यमंत्री अशी अनेक पदे भूषवली. मुस्लिम लोकप्रतिनिधींमधील एक आधुनिक चेहरा अशी त्यांची कायम ओळख राहिली. वैयक्तिक जीवनात कधीही कट्टरतेचा पुरस्कार न करणाऱ्या सिद्दिकी यांना त्यामुळेच सुनील दत्त यांनी आपला शिलेदार म्हणून निवडले. त्यानंतर सिद्दिकी यांनी स्वतःच्या कामातून जनतेच्या मनात कायमचे घर केले होते. काँग्रेसमधून अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत गेलेले सिद्दिकी हे सध्या सत्ताधारी आघाडीत होते. तरीही त्यांना भर रस्त्यात मारण्यात आले. 'देअर इज मच मोर दॅन मिट्स द आय' या इंग्रजी उक्तीप्रमाणेच या संपूर्ण प्रकरणात जे समोर दिसते आहे, त्यापेक्षा कितीतरी गंभीर गोष्टी लपलेल्या असू शकतात. त्या उघड झाल्या तरच अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसू शकेल.

पुन्हा असे प्रकार होवू नये यासाठी कायद्याने कठोर होवून आपली यंत्रणा सक्षम करून गुन्हा जिथे घडला आहे त्या भागातील जे कोणी सराईत गुन्हेगार असतील त्या गुन्हेगारांना रेकॉर्डवर घेवून त्यांच्याकडून माहिती घेवून अशा गुन्हे करणाऱ्यांवर आपला दरारा बसवायला हवा. जर पोलीसांचा गुन्हेगारांवर दरारा राहिला तर मग गुन्हेगारांची हिंमत होणार नाही गुन्हे करण्याची हेही तितकेच सत्य आहे असे आम्हाला वाटते.

## माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या हस्ते प्रभाग ९ मधील रस्त्यांच्या कामांचे भूमिपूजन



लातूर : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते दि. १४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी लातूर शहरातील प्रभाग क्रमांक ९ मधील हॉटेल शिवनेरी ते कावेरी हॉस्पिटल रस्त्याचे डांबरीकरण व श्री एजन्सी ते पडिले घरापर्यंतच्या सिमेंट रस्त्यांचे कॉंक्रिटीकरणासह विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, माजी नगरसेवक अशोक गोविंदपुरकर, ट्वेन्टी वन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, माजी नगरसेविका सपना किसवे, माजी नगरसेविका रेहाना बासले, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती सुनील पडिले, अमर राजपूत, चाँदपाशा इनामदार, हारुन बासले, मनपा अधिकारी बंडू किसवे, सुमुख गोविंदपुरकर, कुणाल वागज, आतीक बासले आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रवादी युवती काँग्रेस-शरदचंद्र पवारच्या प्रदेशाध्यक्षा मा.सक्षना सलगर यांनी पक्ष कार्यालयास भेट



लातूर : राष्ट्रवादी युवती काँग्रेस-शरदचंद्र पवारच्या प्रदेशाध्यक्षा मा.सक्षना सलगर यांनी पक्ष कार्यालयास भेट देऊन लातूर-मुरुड-येडशी-टेंभुर्णी या महामार्गाचे डांबरीकरणासह चौपदरीकरण ही अनेक वर्षांपासून ची जनतेची मागणी केंद्रीय रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्री ना.नितीन गडकरी यांच्याकडून नागपूर येथे ६ दिवसाचे आमरण उपोषण करून मान्य करून घेतली त्याबद्दल त्यांनी माझे अभिनंदन केले. याप्रसंगी तरूण उद्योजक राजववीर राठोड, डॉ संजय राठोड, प्रा. गोविंद पवार(सरपंच), सतिश एकंडे (सरपंच पाडोळी) तसेच पक्षाचे लातूर जिल्हा प्रवक्ते रामराजे आत्राम, लातूर महिला जिल्हाध्यक्षा सौ. रेखाताई कदम, लातूर तालुकाध्यक्ष बकतावर बागवान, उद्योग व व्यापार विभागाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद लोखंडे, जिल्हा सरचिटणीस पुरुषोत्तम पाटील, दत्ता लोभे, सौ महादेवी मेळे इ मान्यवर उपस्थितीत होते.




**लातूर : विजयादशमी निमित्ताने अभियंता ॲड.मैलारीराज कावळे व सौ.सुरेखा कावळे यांच्या हस्ते जय जगदंबा माता मंदिर लातूर येथे सायंकाळी सात वाजता आरती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्या प्रसंगी अनेक मान्यवर व डॉ. जयराज कावळे, राहुल कावळे, रामेश्वरी कावळे आणि भाविकांची उपस्थिती होती.**

# विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत दयानंद विज्ञानचा डंका

## विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत एकूण १३ विद्यार्थ्यांनी मारली बाजी:दयानंदचा लातूर शैक्षणिक पॅटर्न



लातूर : स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेडच्या वतीने घेण्यात आलेल्या उन्हाळी -२०२४ या परीक्षेत दयानंद विज्ञान महाविद्यालयातील बी.एस्सी.पदवी जनरलमध्ये मधुरा जाधव या विद्यार्थिनीने ९०.२३ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्व द्वितीय क्रमांक मिळविला तर बी.एस्सी.जैवतंत्रज्ञानचा विद्यार्थी प्रकाश गवळी यांनी ८५.९२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आला.तसेच पदव्युत्तर एम.एस्सी. सूक्ष्मजीवशास्त्र द्वितीय वर्षातील के.माहेश्वरी ही विद्यार्थीनी ८४.५२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर अक्षता पाटील या विद्यार्थीनीने ८१.९६ टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि प्रतिभा सोनवणे ही विद्यार्थीनी ७९.७६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली.एम.एस्सी.भौतिकशास्त्र या द्वितीय वर्षातील कृष्णकुमार सोनवणे या विद्यार्थ्याने ८६.८८ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आला तर पठाण फिरदोसे अब्दुल हमीद या विद्यार्थीनीने ८३.६० टक्के गुण घेऊन द्वितीय क्रमांक मिळविला आणि शेख अरशिया आयुब ही विद्यार्थीनी ८०.६० टक्के गुण घेऊन विद्यापीठात तृतीय आली. याचबरोबर एम.एस्सी.वनस्पतीशास्त्र या द्वितीय वर्षातील प्रतिक्षा टोंम्पे ही विद्यार्थीनी ९०.२० टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम आली तर गिता दलाल या विद्यार्थिनीने ८८.३६ टक्के गुण घेऊन विद्यापीठात द्वितीय क्रमांक मिळविला व अंकिता धप्पाधुळे या विद्यार्थिनीने ८७.०० टक्के गुण घेऊन तृतीय क्रमांक मिळविला. तसेच एम.एस्सी. रसायनशास्त्र विषयात प्रिती राजहंस या विद्यार्थिनीने ८९.९२ टक्के गुण घेऊन विद्यापीठात सर्वप्रथम क्रमांक पटकाविला तर ऋतुजा वाघमारे या विद्यार्थिनीने ८७.७२ टक्के गुण द्वितीय क्रमांक मिळविला.उन्हाळी-२०२४ विद्यापीठ परीक्षेत एकूण १३ विद्यार्थी झळकल्याने,बाजी मारल्याने दयानंद विज्ञान महाविद्यालयाने आपली गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा व दबदबा कायम राखत लातूर शैक्षणिक पॅटर्न वृद्धिंगत केलेला आहे.त्यांच्या या यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंदराव सोनवणे,उपाध्यक्ष ललितभाई शाह, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा,प्राचार्य डॉ.जयप्रकाश दरगड,प्रभारी प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे,कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव,कनिष्ठ लघुलेखक बन्सी कांबळे, वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.चंद्रशेखर स्वामी, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ.युवराज सारणीकर,भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.विजेंद्र चौधरी,सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ.राहुल मोरे,जैवतंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ.कोमल गोमारे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन व कौतुक केले.

# महात्मा गांधीजींच्या शाश्वत विचार कार्याची बदलत्या काळातही गरज-विवेक सौताडेकर



लातूर : महात्मा गांधीजी विषयी मनात असलेले गैरसमजाचे मळप दूर करून गांधीजींच्या शाश्वत विचारांची आणि कार्याची तरुणांनी कास धरली पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध लेखक तथा इतिहास तज्ज्ञ विवेक सौताडेकर यांनी केले. महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात IQAC, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग, युवती मंच व नारी प्रबोधन मंच, लातूर यांच्यावतीने महात्मा गांधी जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या विस्तार व्याख्यानात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. वनिता पाटील ह्या होत्या. तर विचारपीठावर नारी प्रबोधन मंचाचे अध्यक्ष श्रीमती सुमती जगताप, सचिव प्राचार्य डॉ. कुसुमताई मोरे, युवती मंच प्रमुख डॉ. शितल येरुळे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. मनोहर चपळे, प्रा. किसनाथ कुडके, कला शाखा समन्वयक प्रा. रवींद्र सोनोने, प्रा. विश्वनाथ स्वामी, वाणिज्य शाखा समन्वयक प्रा. वैशाली जयशेट्टी, प्रा. शैलेश कानडे, डॉ. बी. आर. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

पुढे बोलताना सौताडेकर म्हणाले की, महात्मा गांधी हे एक विश्ववंदनीय नेते आहेत. त्यामुळेच त्यांचा जन्मदिवस जागतिक अहिंसा दिन म्हणून पाळला जातो. महात्मा गांधीजींचे ग्राम स्वराज्य विषयक चिंतन, सत्य-अहिंसा, सविनय कायदेभंग, असहकार यातून भारतीय स्वातंत्र्य प्राप्त झालेले आहे. त्यांच्याविषयी तरुण पिढीत समज-गैरसमज पसरवले जातात. हेतू पुरस्सर काही लोक महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुभाषचंद्र बोस, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग, सरदार वल्लभाई पटेल या व इतर राष्ट्रीय नेतृत्वाविषयी प्रत्यक्ष वस्तूस्थिती न मांडता लोकांमध्ये गैरसमज पसरवण्यात येतात. बदलत्या काळातही गांधी विचार हा प्रेरणादायी असून त्याचा अंगीकार तरुण पिढीने केला पाहिजे, असेही ते म्हणाले.

यावेळी सुमती जगताप म्हणाल्या की, गांधीजींच्या जीवनातील अनेक प्रसंग सांगून गांधी विचारांची प्रासंगिकता सांगितली. यावेळी बोलताना प्राचार्या डॉ. कुसुमताई मोरे यांनी नारी प्रबोधन मंचाचे कार्यक्रम, उद्दिष्टे आणि स्वरूप विद्यार्थ्यांना स्पष्ट करून सांगितले. आपल्या अध्यक्षीय समारोपात प्रा. वनिता पाटील यांनी गांधी विचार हा विश्वव्यापी विचार असून येणाऱ्या असंख्य पिढ्यांसाठी प्रेरणादायी असा विचार आहे, असेही त्या म्हणाल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शीतल येरूळे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. अश्विनी रोडे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ. रत्नाकर बेडगे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता रमेश राठोड, आनंद खोपे, राजू बोडके यांनी परिश्रम घेतले.

# नगराधध्यक्ष कपिल माकणे यांनी घेतले जनमाता देवीचे दर्शन



चाकूर(प्रतिनिधी): चाकूर तालुक्यातील हाळी खुर्द (खुर्दळी) येथील नवसाला पावणाऱ्या सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान असलेल्या जनमाता देवीचे दर्शन विजयादशमी निमित्ताने चाकूरचे नगराध्यक्ष कपिल माकणे यांनी घेतले.

यावेळी पंचायत समितीच्या माजी उपसभापती लताताई चांडसुरे, युवा नेते सागरभैया होळदांडगे, लातूर येथील आरोग्य व औषधी क्षेत्रातील व्यावसायिक रत्नदीप चांडसुरे, महालक्ष्मी एजन्सीचे मनोज आलमाजी आदि उपस्थित होते.

मान्यवरांनी मंदिर व परिसराची पाहणी करून विश्वस्त मंडळाचे कौतुक केले. यावेळी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष शरद पाटील सचिव ज्ञानोबा जाधव, कोषाध्यक्ष संगमेश्वर जनगावे, विश्वस्त तथा श्रीदत्त मंदिर मठ संस्था लखनगावचे मठाधिपती आबा महाराज गिरी, पांडुरंग शिंदे, वार्षिक अन्नप्रसादाचे प्रमुख जगदीश भोसले, पोलीस पाटील साहेबराव पाटील, माजी उपसरपंच पांडुरंग भोसले, वामन नरहरे, हावगीराज जनगावे, शिवगीर गिरी, विनोद पाटील, विकास पाटील, गणेश हाके, अंबादास बिडवे, महेश बिडवे, जब्बार पटेल, गोरख सुर्यवंशी, विशाल नरहरे, ऋषि नरहरे, ईश्वर रेड्डी, महमंद शेख, पांडुरंग बिडवे, राहुल जाधव, रूद्र जाधव, श्रीकांत चव्हाण, सोमनाथ सांगवे, गंगासागर बिडवे, संजीवना बिडवे यांच्यासह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.अब्दुल कलाम हे भारत देशासाठी आखरी श्वासापर्यंत कार्य करणारे महान शास्त्रज्ञ-गुणवंत मिसलवाड



नांदेड- आपल्या भारत देशाच्या आंतरिक्ष सुरक्षा संरक्षणासाठी खूप मोठे योगदान देऊन अनेक मिसाईल अस्त्र बनवून जगात भारत देशाचे नाव उंचावणारे आखरी श्वासापर्यंत देशासाठी कार्य करणारे महान शास्त्रज्ञ म्हणजे मिसाईलमॅन डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम हे होत असे प्रतिपादन एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते मा. श्री. गुणवंत एच. मिसलवाड यांनी केले. ते महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथे दि. १५ ऑक्टोंबर २०२४ मंगळवार रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता भारतरत्न, पद्मभूषण, पद्मविभूषण, भारताचे ११ वे माजी राष्ट्रपती, मिसाईलमॅन डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांची ९३ वी जयंती वाचक प्रेरणा दिन व जागतिक विद्यार्थी दिन म्हणून मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या अभिवादन कार्यक्रम सोहळ्यात ते बोलत होते.

सर्वप्रथम आगाराचे वाहतुक निरीक्षक मा. श्री. आकाश भिसे यांच्या हस्ते डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करुन पुष्पमाला अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ते पुढे आपल्या भाषणात म्हणाले की, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी अग्नी-१, अग्नी -२, अग्नी- ३, आकाश, नाग, त्रिशूल या क्षेपणास्त्रांची निर्मिती केली. ते इस्त्रोचे महान वैज्ञानिक होते. अशा या महान विभूतीचा आपण सर्वांनीच आदर्श घेऊन समाजाप्रती, राष्ट्राप्रती कार्य करण्याची ही काळाची गरज आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून वाहतुक निरीक्षक आकाश भिसे, वाहतुक नियंत्रक आनंदा कंधारे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड, वरिष्ठ लिपीक नितीन मांजरमकर, गुलाम रब्बानी, सौ. रेखा माचीनवार, सुनीता हुंबे, मनिषा कदम, कृष्णा पवार, संजय मंगनाळे, शिवचरण मळगे, वैष्णवी गंदेवार, प्रियंका खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रा. प. म. आगारातील कामगार - कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# क्वॉईल नगर नागरीकांच्या मदतीला धावली 'युथ पँथर संघटना'

लातूर : कॉईल नगरची हाक युथ पँथरची साथ युथ पँथर संघटनेच्या मोठ्या लढ्याला यश युथ पँथर संस्थापक अध्यक्ष संतोष वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली कॉईल नगर झोपडपट्टी तील नागरीकांना घरकुल योजनेचा लाभ भेटण्यासाठी जिल्हाध्यक्ष धनराज कांबळे यांच्यावतीने वारंवार निवेदन देऊन सतत पर्यतनातून लातूर महानगरपालिकाच्यावतीने कॉईल नगर झोपडपट्टीतील नागरीकांना रमाई आवास योजनेतून व प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुलचा लाभ देऊ असे लिखीत स्वरुपात पत्र हे लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने युथ पँथर संस्थापक अध्यक्ष संतोष वाघमारे, संस्थापक उपाध्यक्ष सिद्धार्थ कव्हेकर ,संस्थापक प्रवक्ते प्रताप कांबळे, लातूर जिल्हाध्यक्ष धनराज कांबळे, कॉईल नगर भागातील नागरीक यांना देण्यात आले.



युथ पँथर महाराष्ट्र राज्य च्या वतीने लातूर महानगरपालिके चे जाहीर आभार तसेच महापालिकेचे आयुक्त व विभाग प्रमुखाचे ही जाहीर आभार!


# सोहम आयुर्वेदिक सुगंधी आणि गुणकारी उटणे...!!!

(विक्रीतून मिळालेले उत्पन्न भीक मागणाऱ्या लोकांची आणि त्यांच्या मुलाबाळांची दिवाळी साजरी करण्यासाठी वापरणार आहोत) ग्रंथात सांगितल्याप्रमाणे, डॉ मनीषा सोनवणे, आयुर्वेद तज्ञ, यांनी हे सुगंधी तथा गुणकारी उटणे तयार केले आहे. यातून मिळणारा निधी रस्त्यावरील भीक मागणाऱ्या लोकांची दिवाळी साजरी करण्यासाठी वापरणार आहोत. रस्त्यांवरील गोरगरिबांच्या मुखात घास भरवुन, खऱ्या अर्थाने सुगंधी व्हायचे असेल, तर नक्की खरेदी करावे... !!!

वजन - १०० ग्रॅम, किंमत रु.१००

**त्वचेच्या अनेक विकारांवर अत्यंत गुणकारी.**

आपणास हवी असलेली पाकिटे ऑर्डर करून, ९८२२२६७३५७ या नंबर वर गुगल पे करावे आणि याच नंबरला स्क्रीन शॉट पाठवून पूर्ण नाव, पिन कोड सहित पत्ता आणि फोन नंबर कळवावा.



कुरियर चार्जेस एक्स्ट्रा

आपले नम्र,

डॉ. अभिजीत सोनवणे डॉ मनीषा सोनवणे


## ज्ञानेश्वरच्या शेख आरहानची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड

लातूर : नांदेड येथे संपन्न झालेल्या विभागीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धेत आपल्या विद्यालयातील विद्यार्थी शेख आरहान इकबाल वर्ग-८वी (आय) याने १७ वर्षा आतील वयोगटात व ४० किलो आतील वजन गटात भीमकाय पराक्रम करत सुवर्ण पदक पटकाविले. आरहान ची निवड राज्यस्तरीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धेसाठी झाली आहे.अरहानच्या या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. मलवाडे सर उपमुख्याध्यापक श्री.क्षिरसागर सर क्रीडा विभाग प्रमुख श्री.रुकमे सर व आदी मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.




हे पत्रक मुद्रक महेश मोतीराम राठोड यांनी प्रकाशक, संपादक, मालक शिरीषकुमार तुकाराम शेरखाने यांच्यासाठी मयुर प्रिंटर्स, बी-२८, एम.आय.डी.सी., लातूर येथे मुद्रित करून ऋतुप्रेम, मुक्ताई नगर,एस.टी.वर्कशॉप पाठीमागे, अंबाजोगाई रोड, लातूर. जि.लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशित केले. संपादक - शिरीषकुमार तुकाराम शेरखाने, मो. : 9049844412 आर.एन.आय.नं. RNI No. : MAHMAR/2023/86200

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD AND PUBLISHED AND OWNED BY SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE AND PRINTED AT MAYUR PRINTERS, B-28, M.I.D.C.,LATUR -413512 (MAHA.)AND PUBLISHED AT RUTUPREM, MUKTAINAGAR, AMBAJOGAI ROAD, BEHIND S.T.WORK SHOP LATUR DIST. LATUR - 413512 (MAH.) EDITOR : SHIRISHKUMAR TUKARAM SHERKHANE RNI No. : MAHMAR/2023/86200

# ‘आई राजा उदो उदो’ च्या जयघोषाने तुळजाई नगरी दुमदुमली, एनसीआयबी ने सेवा-सुरक्षा निभावली




तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवात पोलीस विभाग, बी.व्ही.जी.ग्रुप, सेक्युरिटी ग्रुप, होमगार्ड, आरोग्य विभाग, अग्नीशमन, एनसीआयबी अधिकारी यांनी भावीकांची सेवा सुरक्षा पुरविण्यात येत असलेल्या कार्याचे कांही प्रासंगिक छायाचित्र.

**राष्ट्रीय अपराध जाँच ब्यूरो नवी दिल्ली(महाराष्ट्र राज्य) शारदीय नवरात्र महोत्सवात तुळजापूर येथे सेवा दिलेले शाखा, लातूरचे अधिकारी**



| सुरेशकुमार शुक्ला | ॲड.चंद्रशेखर धोत्रे | शिरीषकुमार शेरखाने | ॲड.बसवेश्वर पसारे | प्रा.सुधीर चेरेकर | प्रा.सुरेशकुमार तायेडू | रुद्रक टाचले | दत्तप्रसाद कुलकर्णी | संजय बोंदर | गिरीष कानडे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जनरल डायरेक्टर नवी दिल्ली | राज्य संचालक महाराष्ट्र राज्य | डिस्ट्रीक्ट डायरेक्टर लातूर जिल्हा | एनसीआयबी ऑफिसर, लातूर | एनसीआयबी ऑफिसर, लातूर | एनसीआयबी ऑफिसर, लातूर | एनसीआयबी ऑफिसर, लातूर | एनसीआयबी ऑफिसर, लातूर | एनसीआयबी ऑफिसर, धाराशिव | एनसीआयबी ऑफिसर, धाराशिव |

तुळजापूर (प्रतिनिधी): महाराष्ट्राची कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी शारदीय नवरात्र महोत्सवात २०२४ च्या आई जगदंबेच्या दर्शनासाठी दरवर्षी भाविक मोठ्या प्रमाणात लाखोंच्या संख्येने तुळजापूर मध्ये येत असतात. विशेषतः कर्नाटक राज्यातून सीमावरती भागातून अधिक भाविक येत असतात.

पायी चालणाऱ्या मध्ये महाविद्यालयीन तरुण-तरुणी महिला नागरिक यांचे प्रमाण अधिक दिसते. या भाविकेच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी जिल्हाधिकारी तथा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थांचे अध्यक्ष डॉ. सचिन ओंबासे, पोलीस अधीक्षक, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानचे व्यवस्थापक प्रशासन अधिकारी तथा तहसीलदार सौ. माया माने, यांच्या नियंत्रणाखाली चोख व्यवस्था करण्यात आली.

आरोग्य विभाग यांनी भक्त जणांच्या वेळोवेळी प्रसंगानुसार काळजी घेऊन औषधोपचार तत्परतेने करणे, सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलीस विभाग, होमगार्ड, बीव्हीजी ग्रुप, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थांनचे सुरक्षारक्षक, प्रशासकीय अधिकारी, नामवंत पुजारी, अहोरात्र परिश्रम घेत असताना दिसले. अनेक जण देवीच्या दर्शनासाठी वेगवेगळ्या पद्धतीने कसरत करत होते. पायी चालणाऱ्या भक्तांचे ग्रुप (जथ्थ्यांचे जथे) पहावयास मिळत होते. पायी चालणाऱ्या भक्तासाठी जागोजागी अन्नछत्रांचा सहारा घेत मुक्काम करीत असताना दिसत होते. तुळजापूर मार्गस्थ ठिकाणी काही दानशूर सेवाभावी संस्था, स्वयंसेवी संस्था, विविध संघटना, सामाजिक कार्यकर्ते, अन्नछत्र उभारून भाविकांना सेवा देण्याचे कार्य मोठ्या प्रमाणावर दिसत होते. जागोजागी चहा, फराळ, भोजन, उपवासासाठी साबुदाणा खिचडी, फळफळावळ, पाणी, आरोग्य विषयक औषधे सुविधा पुरविण्यात येत होत्या. पायी चालणाऱ्या भक्तांच्या पायाला फोड आले असता जीवाचे रान करून देवीचे दर्शन घेतल्याशिवाय चैन पडत नसेल अशी मनाशी जिद्द बाळगून महत्त्वकांक्षेच्या जोरावर ते दर्शनासाठी विजय प्राप्त करत असलेले दिसून येत होते.

या विविध भाविकांच्या सेवा सुरक्षा करिता राष्ट्रीय अपराध ज्यांच ब्युरो नवी दिल्लीचे जनरल डायरेक्टर सुरेशकुमार शुक्ला, महाराष्ट्र राज्याचे राज्य संचालक ॲड. चंद्रशेखर धोत्रे, हे शारदीय नवरात्र महोत्सवाच्या काळात गेल्या दोन वर्षापासून सतत अविरत अखंड सेवा सुरक्षा देण्याचे कार्य हाती घेऊन यशस्वीपणे राबविले. त्याचप्रमाणे याही वर्षी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, तहसीलदार यांना आठ दिवस अगोदर पत्रव्यवहार करून भक्तांची सेवा करण्यासाठी परवानगी घेतली. त्याप्रमाणे राज्य संचालक ॲड. चंद्रशेखर धोत्रे,जिल्हालातूर शाखेचे, डिस्ट्रिक्ट डायरेक्टर शिरीषकुमार शेरखाने, ॲड. बसवेश्वर पसारे, प्रा. सुधीर चेरेकर, प्रा. सुरेशकुमार तायडू, दत्तप्रसाद कुलकर्णी, रुद्रक टाचले, संजय बोंदर, गिरीश कानडे, या सर्वांनी भक्तजनांना देवीच्या दर्शनासाठी उत्कृष्ट सेवा सुरक्षा देण्याचे कार्य केले. दर्शन घेतल्यानंतर आपापल्या गावी जाण्यासाठी मार्गस्थ होत असताना आई राजा उदो उदो च्या जयघोषणाने तुळजाईनगरी दुमदुमली. सर्व भाविकांच्या चेहऱ्यावर प्रसन्नतेचा भाव दिसत होता. भाविकांच्या जीवनातला अवीस्मरणीय प्रसंग पाहायला मिळाला.



15 ऑक्टोबर

ज्येष्ठ चित्रकार संजय तुकाराम शेरखाने यांना वाढदिवसानिमित्त

हार्दिक शुभेच्छा!

: शुभेच्छूक :

खबर से हकीकत तक वृत्तपत्र आणि शेरखाने परिवार, लातूर

## लातूर येथील बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये दांडिया महोत्सव उत्साहात साजरा

लातूर : बिर्ला ओपन माईंड्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये दसऱ्यानिमित्त शाळेमध्ये रावण बनवण्यात आला होता असत्यावर सत्याचा विजय कसा मिळाला याचा एक संदेश विद्यार्थ्यांना दिला हे रावण बनवण्यासाठी शाळेतील कलाशिक्षक महेश शिंदे सर तसेच विद्यार्थ्यांनीही सहभाग नोंदवला होता.

त्यानंतर सकाळी शाळेमध्ये रावण उभा करून रावण दहन करण्यात आले त्यावेळेस शाळेतील सर्व विद्यार्थी तसेच पालकांनीही रावण दहन करते वेळेस पाहिले आणि सायंकाळी विद्यार्थ्यांसाठी दांडिया ठेवण्यात आले होते या दांडियासाठी विद्यार्थ्यांचा तसेच महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता.



त्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर रचना जाजू मॅडम यांची उपस्थिती लाभली होती दांडिया रास मध्ये विद्यार्थ्यांसाठी तसेच पालकांसाठी वेगवेगळी पारितोषिके ठेवण्यात ठेवण्यात आलेली होते शाळेचे प्राचार्य अनिल पोल, उपप्राचार्य अजय शर्मा, व्यवस्थापक वैजनाथ कदम, तसेच संस्थेचे अध्यक्ष संभाजी सुळ सर, सीए दिगंबर साके सर, सीए संभाजी सरडे सर, एडवोकेट सचिन सुळ सर, शाळेतील सर्व शिक्षक यांनी उपस्थित राहून सर्व विद्यार्थ्यांना व पालकांना प्रोत्साहन दिले. याचबरोबर फिटनेस ट्रेनर रोहिनी दायमाजी, स्नेहा सारडा आणि गौरवी सारडा यांनी गरबा, दांडिया अशा विविध राऊंड्स चे अचूक परीक्षण करत विद्यार्थ्यांना वा पालकांना पारितोषिके देऊन प्रोत्साहन केले. हा पूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये नृत्य शिक्षक अक्षय बारस्कर, कार्यक्रम समनवयक दत्ता कांबळे व सर्व शिक्षक स्टाफ ने मोठे योगदान दिले.



14 ऑक्टोबर

लातूर स्थानिक गुन्हे शाखेचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक संजीवनजी मिरकले यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

: शुभेच्छूक :

खबर से हकीकत तक वृत्तपत्र आणि शेरखाने परिवार, लातूर